# मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे

मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे हे महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या अंतर्गत एक घटक असून प्राधिकरणामार्फत विविध शासकीय, निमशासकीय, खाजगी जमिनीवर असलेल्या संरक्षित झोपडपट्टीमधील झोपडीधारकांचे राहणीमान उंचावणेकामी पात्र झोपडीधारकांना पक्की घरे देण्याबाबतचे नियोजन व अंमलबजावणी केली जाते.

**योजनेची माहिती:-**

- ठाणे, नवी-मुंबई, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपुर, वसई-विरार, मिरा- भाईंदर, उल्हासनगर व पनवेल या ८ महानगरपालिका तसेच अंबरनाथ, बदलापूर, अलिबाग, पेण, खोपोली, माथेरान, कर्जत व पालघर या ८ नगरपरिषद आणि बोईसर ग्रामपंचायत कार्यक्षेत्रांकरिता मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे स्वतंत्र प्राधिकरण नियुक्त करण्यात आले आहे.
- प्राधिकरणामार्फत विकास नियोजन व प्रोत्साहन नियमावली सन २०२० मधील तरतुदी नुसार पात्र झोपडीधारकांना ३०० चौ.फु. चटई क्षेत्रफळ असलेली सदनिका विविध सुविधांसह जसे की बालवाडी, समाजमंदिर, सोसायटी कार्यालय, वाचनालय, कौशल्यविकास केंद्र इ. उपल्बध करुन दिले जातात.
- सदर योजनेमध्ये योजना पुर्णत्वास नेण्याकरीता विकासक व वास्तूविशारद निवड करण्याचे सर्वस्वी अधिकार हे झोपडीधारकांकडेच असतात, ५१ टक्के किंवा त्याहून अधिक झोपडीधारकांनी एकत्र येऊन स्वेच्छेने आपल्या विकासकाची नियुक्ती करावयाची असते.
- जागेवरील झोपड्या हटविल्यानंतर झोपडीधारकांना अस्थायी संक्रमण शिबिरात (Transit Camp) घरे दिली जातात अथवा प्राधिकरणाच्या नियामानुसार झोपडी खाली केल्याच्या दिनांकापासून घरभाडे दिले जाते.
- योजनेतील अपात्र झोपडीधारकांना अपर जिल्हाधिकारी ठाणे तथा अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे पात्रतेकरीता अपिल दाखल करता येते व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडील अपिलातील आदेशाने व्यथीत झालेल्या झोपडीधारकास तक्रार निवारण समितीकडे (GRC) अपिल दाखल करण्याची तरदूत आहे.
- दिनांक ०१/०१/२००० पूर्वीच्या योजनेतील पात्र झोपडीधारकांना मोफत घर देण्यात येते तसेच दिनांक ०१/०१/२००० नंतर परंतु ०१/०१/२०१० पर्यंतच्या संरक्षण पात्र झोपडी धारकास सशुल्क म्हणजे २.५ लाख इतकी रक्कम घेऊन सदनिका विस्तारित करण्यात येते.
- योजनेतील इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर इमारतीमधील सदनिकांचे/गाळयांचे वितरण लॉटरी पद्धतीने झोपडीधारकांना केले जाते.
- योजनेतील पात्र झोपडीधारकांना सदनिका वाटप केल्याच्या दिनांकापासून पुढील पाच वर्षे खरेदी-विक्री किंवा सदनिका भाडे तत्वावर देता येत नाही. एखाद्या झोपडीधारकास पाच वर्षांनंतर सदनिकेची खरेदी विक्री करावयाची असल्यास, मुळ झोपडीधारकाने प्राधिकरणास अर्ज करून नियमाप्रमाणे सदनिकेची मुद्रांक शुल्क भरून सदनिकेची खरेदी विक्री करता येते.
- झोपडपट्टी पुनर्वसन योजना ही राज्य शासनाची एकमेव अधिकृत योजना आहे ज्यामध्ये झोपडीधारकांना सर्व सुखसोयीसह 'मोफत घरे' मिळवुन देण्यासोबतच झोपडपट्टीवासीयांना हक्काचे घर देणे व त्यांचे जीवनमान उंचावणे हे ध्येय शक्य झालेले आहे.

## झोपडपट्टीवासीयांच्या समस्या व योजनेतील फायदे:-

| अ.क्र. | झोपडपट्टीमधील झोपडीधारकांच्या समस्या / अडचणी | झो. पु. योजनेमुळे होणारा बदल |
|---|---|---|
| १. | झोपडपट्टी वसाहतीमध्ये वीज/पिण्याचे पाणी/पक्की घरे यांसारख्या मुलभुत सुविधांचा अभाव आढळुन येतो. | योजनेमुळे झोपडीधारकांना मुलभुत सुविधा प्राप्त होऊन त्यांच्या स्वप्नातील हक्काच्या/पक्क्या घराचे स्वप्न पुर्ण होते. |
| २. | झोपडपट्टी वसाहतीमधील लहान मुलांना खेळण्याकरिता व अभ्यासाकरिता अपुरी जागा असल्याने त्यांच्या सर्वांगिण विकासास अडथळा येत असतो. | झो. पु. योजनेमुळे लहान मुलांना खेळण्यास मोठया प्रमाणात जागा उपलब्ध होते. तसेच अभ्यासाकरिता मोठी जागा व चांगले वातावरण मिळाल्याने त्यांचे भवितव्य सुधारण्यास मदत होते. याव्यतिरिक्त योजनेतील मुलांना बालवाडी, वाचनालय, कौशल्य विकास केंद्र उपलब्ध होते, याव्दारे त्यांचा शारिरिक व मानसिक असा एकात्मीक विकास होण्यास मदत होते. |
| ३. | दरवर्षी पावसाळ्यात झोपडपट्टीक्षेत्रातील घरांमध्ये पाणी साचून झोपडीधारकांचे बरेचसे वित्तीय नुकसान होऊन, पावसाळयात झोपडीधारकांना पाण्यामुळे संसर्गजन्य आजारास सामोरे जावे लागते. | याउलट झो. पु. योजनेतील पक्क्या इमारतीमधील घरामुळे दरवर्षी पावसाळ्यात होणाऱ्या नुकसानीस सामोरे जावे लागत नाही. |
| ४. | झोपडपट्टी वसाहतीमध्ये शौचालयास घरांपासून लांब जावे लागते व तेथे देखील लांब रांगामध्ये उभे रहावे लागते. | झो. पु. योजनेमुळे प्रत्येक घरांमध्ये स्वतंत्र शौचालय असल्याने शौचालयाच्या समस्यांना सामोरे जावे लागत नाही. परिणामी महिला व लहान मुलांना लांब रांगामध्ये उभे रहावे लागत नाही. |
| ५. | झोपडपट्टी वसाहतीत घरांमधील अंतरे फार कमी असल्यामुळे कौटुंबिक जीवनातील गोपनियता (Privacy) हवी तशी राहत नाही. | याउलट योजनेतील इमारतीमधील सुटसुटीत अंतरातील घरांमुळे कौटुंबिक जीवनातील गोपनियता (Privacy) राखली जाते. |
| ६. | झोपडपट्ट्यांमधील छोट्या रस्त्यांमुळे रुग्णवाहिका येण्या-जाण्यास अडथळा येत असतो. बहुतांश ठिकाणी रुग्णास स्ट्रेचरवरून घेऊन जाण्यास देखील रस्ता उपलब्ध नसतो. | आपात्कालीन वेळी रुग्णवाहिका निवासी इमारतीपर्यंत पोहोचू शकत असल्याने रहिवाशांची/रुग्णांची गैरसोय होत नाही. |

मंडई इमारत, खेवरा सर्कल ग्लॅडिअल्वारीस रस्ता, मानपाडा, ठाणे (पश्चिम) ४००६१०
दूरध्वनी क्रमांक ०२२ – ४१३५६८४० | ई-मेल thane@sra.gov.in